परिविक्षाधीन गट विकास अधिकारी गट-अ आणि सहाय्यक गट विकास अधिकारी गट-ब यांना जिल्हा स्तरावरील प्रशिक्षणाकरिता जिल्हा वाटप करण्याबाबत- सीपीटीपी-४.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः मविसे १०/२०१७/प्र.क्र.५२/आस्था-३(अ)

बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई ४००००१

मंत्रालय,मुंबई

तारीख: ४ जानेवारी, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ दि.२०.१.२०१४

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग. क्र.टिआरएन-१११४/ प्र.क्र.८३/ १८-ब दिनांक ३.११.२०१४

३) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन-७१५/प्र.क्र.८३/१८-ब दिनांक १३.७.२०१५

४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग. क्र.टिआरएन-०२१६/प्र.क्र.५८/सीपीटीपी दिनांक ४.१.२०१७

प्रस्तावना -

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा परीक्षेमधून सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांना एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०१६ मधून शिफारस प्राप्त झालेल्या महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ मधील परिवीक्षाधीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी गट-अ आणि महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब मधील परिवीक्षाधीन सहाय्यक गट विकास अधिकारी गट-ब यांचे एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण यशदा, पुणे येथे सुरु आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर प्रशिक्षणार्थींना तिसऱ्या टप्प्यामध्ये विभागामार्फत ७९ आठवडयांचे प्रशिक्षण जिल्हास्तरावर दयावयाचे आहे. संदर्भ क्र.२ अन्वये सदर ७९ आठवडयांच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा वाटपाबाबत मार्गदर्शक सूचना सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केल्या आहेत. संदर्भाधीन क्र.३ येथील शासन परिपत्रकानुसार प्रशिक्षणार्थींना जिल्हास्तरावरील ७९ आठवडयांपैकी १/३ कालावधी संलग्न प्रशिक्षण व १/३ कालावधी लगतपूर्व पदाचा स्वतंत्र कार्यभार याप्रमाणे प्रशिक्षणाकरिता पदस्थापना देण्याचे विभागाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय-

सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ आणि गट-ब मधील परिवीक्षाधीन अधिका-यांना तिसऱ्या टप्प्यामध्ये विभागामार्फत प्रशिक्षणासाठी जिल्हा वाटप करण्यांत येत आहे. दोन्ही संवर्गासाठी सदर प्रशिक्षणाबाबतची कार्यक्रम पुस्तिका राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे मार्फत तयार करण्यात आली आहे. सदर कार्यक्रम पुस्तिकेनुसार ७९ आठवडयांपैकी १/३ कालावधी संलग्न प्रशिक्षण व १/३ कालावधी लगतपूर्व पदाचा स्वतंत्र कार्यभार असून उर्वरित आठवड्यांचा स्वतंत्र कार्यभार सदर प्रशिक्षणार्थींना देण्यात येणार आहे. त्यानुसार महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ संवर्गात यशदा येथे प्रशिक्षण घेत असलेल्या परिवीक्षाधीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी गट-अ मधील १० परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांना परिशिष्ट-अ येथे त्यांच्या नांवासमोर नमूद केलेल्या जिल्हा परिषदेमध्ये आणि महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब संवर्गातील परिवीक्षाधीन सहाय्यक गट विकास अधिकारी गट ब मधील १ परिवीक्षाधीन अधिकाऱ्याला परिशिष्ट-ब येथे त्यांच्या नांवासमोर नमूद केलेल्या जिल्हा परिषदेमध्ये प्रशिक्षणाकरिता पदस्थापना देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ आणि गट-ब मधील परिवीक्षाधीन प्रशिक्षणार्थींना यशदा, पुणे या संस्थेने जिल्हा स्तरावरील प्रशिक्षणाकरिता कार्यमुक्त करावे. तसेच सदर प्रशिक्षणा दरम्यान घेण्यात येणाऱ्या चाचणी परिक्षांबाबत यशदामधील समन्वय अधिकाऱ्यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेशी समन्वय ठेवून कार्यक्रम पुस्तिकेतील वेळापत्रकाप्रमाणे चाचणी परीक्षा घ्याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०४१३२४२१५८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Natha Savane

Digitally signed by Rajendra Natha Savane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=0a2ac5ab6ca0075cc776c90ec03925f2eb8727640eacf311beb6f68d63939303, serialNumber=f049989dbbef93340e9edd88af960a0963746d42baa5c948405b62e821529a99, cn=Rajendra Natha Savane
Date: 2018.01.04 17:26:56 +05'30'

(रा.ना.सवने)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत-

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
४. विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद व अमरावती.
५. महासंचालक, यशदा , पुणे
६. संचालक, वनामती, नागपूर
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, पुणे, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, अमरावती.
८. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, पुणे, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, अमरावती.
९. कोषागार अधिकारी, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, पुणे, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, अमरावती.
१०.अर्थसंकल्प-३, १६ व व्यय-१५, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई.
११.कार्यासन-वित्त-१, आस्था-३, वित्त-९ ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती, आस्था-३(अ)

परिशिष्ट "अ"

ग्राम विकास विभाग, शासन निर्णय,क्र.मविसे १०/२०१७/प्र.क्र.५२/आस्था-३(अ),
दि. ४.१.२०१८ चे सहपत्र.

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम, CPTP-४ अंतर्गत यशदा, पुणे येथे एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षणाकरिता रुजू झालेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ पदावरील १० अधिकाऱ्यांना ७९ आठवडयांचे "जिल्हास्तर व स्वतंत्र कार्यभार" या प्रशिक्षणासाठी पुढीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हा परिषदेमध्ये पदस्थापना देण्यांत येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	स्व महसुली विभाग	स्व- जिल्हा	प्रशिक्षणासाठी देण्यांत आलेला जिल्हा
१.	श्री.अजयकुमार कल्याण नष्टे	पुणे	पुणे	जिल्हा परिषद, अहमदनगर
२.	श्री. अनिल हनुमंत नागणे	पुणे	पुणे	जिल्हा परिषद, नाशिक
३.	श्रीम. अंशुजा मधुकर गराटे	नागपूर	नागपूर	जिल्हा परिषद, अमरावती
४.	श्री. किरणकुमार सिद्धू धनावडे	पुणे	कोल्हापूर	जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
५.	श्री. कुलदीप कालिदास कांबळे	औरंगाबाद	उस्मानाबाद	जिल्हा परिषद, सातारा
६.	श्री. महेश विश्वनाथ पाटील	पुणे	सोलापूर	जिल्हा परिषद, लातूर
७.	श्री.मनोज बापूराव राऊत	पुणे	सोलापूर	जिल्हा परिषद, उस्मानाबाद
८.	श्री.नारायण बाबासाहेब मिसाळ	औरंगाबाद	बीड	जिल्हा परिषद, पुणे
९.	श्री.प्रकाश लालासाहेब पोळ	पुणे	सातारा	जिल्हा परिषद, रत्नागिरी
१०.	श्रीम.समृद्धी लालाजी दिवाणे	औरंगाबाद	उस्मानाबाद	जिल्हा परिषद, सोलापूर

परिशिष्ट "ब"

ग्राम विकास विभाग, शासन निर्णय,क्र.मविसे १०/२०१७/प्र.क्र.५२/आस्था-३(अ),
दि. ४.१.२०१८ चे सहपत्र.

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम, CPTP-४ अंतर्गत यशदा, पुणे येथे एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षणाकरिता रुजू झालेल्या सहाय्यक गट विकास अधिकारी, गट-ब पदावरील १ अधिकाऱ्याला ७९ आठवडयांचे "जिल्हास्तर व स्वतंत्र कार्यभार" या प्रशिक्षणासाठी पुढीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हा परिषदेमध्ये पदस्थापना देण्यांत येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	स्व महसुली विभाग	स्व- जिल्हा	प्रशिक्षणासाठी देण्यांत आलेला जिल्हा
१.	श्री. निखिल लालासाहेब गावडे	पुणे	सातारा	जिल्हा परिषद, अहमदनगर